# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
## शुक्रवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२४

### ठळक बातम्या

1. **देश गगनयान मोहिमेची प्रतीक्षा करत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं पहिल्या अंतराळ दिनाच्या कार्यक्रमात प्रतिपादन, नागपुरात बहुविध कार्यक्रमांचं आयोजन.**
2. **लाडकी बहिणी बरोबरच सुरक्षीत बहिण योजनाही राबवणार- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाशिकच्या महिला मेळाव्यात ग्वाही.**
3. **गणेश मंडळाच्या परवानगीसाठी संपूर्ण शुल्क माफ-नागपूर शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मनपा आयुक्तांनी जारी केल्या मार्गदर्शक सूचना.**

**आणि**

4. **आयकर अधिकाऱ्यांनी व्यावसायिक कारकिर्दीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुयोग्यपणे उपयोग करावा- नागपूरच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विजेंदर कुमार यांचं आवाहन.**

****

अंतराळ दिवस राष्ट्रीय

नवी दिल्ली इथं आज पहिल्या अंतराळ दिनानिमित्त कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भारतीय चांद्रयान, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर गेल्या वर्षी याच दिवशी उतरलं होतं. भारताची अंतराळ क्षेत्रातील प्रगती अनन्यसाधारण आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी याप्रसंगी केलं. इस्रोनं अंतराळ क्षेत्राबरोबरच देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात योगदान दिलं आहे, असं त्या म्हणाल्या. चंद्राच्या अध्ययनासाठी इस्रो आणखी योजना आखत असल्याबद्दल राष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला. देश गगनयान मोहिमेची प्रतीक्षा करत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते रोबोटिक्स चॅलेंज आणि भारतीय अंतरीक्ष हॅकेथॉनच्या विजेत्यांना पारितोषिकं देण्यात आली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्या राष्ट्रीय

अंतराळ दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आजचा दिवस भारतीय अंतराळ शास्त्रज्ञांच्या योगदानाची प्रशंसा करण्याचा आहे. सरकारनं या क्षेत्राशी संबंधित दूरदृष्टीचे निर्णय घेतले आहेत आणि आगामी काळातही घेऊ असं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था नागपूर इथं आज राष्ट्रीय अवकाश दिन साजरा करण्यात येत असून, या अंतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. यामध्ये स्पेस हॅकेथॉन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले याशिवाय विविध अवकाशीय मॉडेल्सचे प्रदर्शन भरवण्यात आले. स्थानिक प्रो.राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी तर्फे आज सायंटिफिक पोस्टर मेकिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि अवकाश विज्ञानावरील आभासी व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पहिल्या अंतराळ दिनानिमित्त वाशीम येथील हॅपी फेसेस शाळेत पहिला अंतराळ दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांना चांद्रयान प्रक्षेपण तसेच लँडिंग करतांनाचे काही माहितीपट दाखविण्यात आले.

लखपती दीदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी महाराष्ट्रात जळगाव इथं येणार आहेत. त्यांच्या हस्ते येत्या अकरा लाख लखपती दीदींना प्रमाणपत्रांचं दूरस्थ पद्धतीनं वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान, लखपती दीदींशी संवाद साधणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते दोन हजार पाचशे कोटी रुपयांचा ‘सामुदायिक गुंतवणूक निधी’ हा पुनरावर्ती निधी यावेळी जारी करण्यात येणार आहे. देशातल्या विविध जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी या कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी होणार आहेत.

आकाशवाणी क्षेत्रीय कार्यक्रम बैठक

आकाशवाणी हे ज्ञान आणि मनोरंजनाचं माध्यम आहे, ते टिकून राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे असं प्रतिपादन आज पश्चिम क्षेत्राचे कन्टेन्ट विभागाचे अपर महानिदेशक-विश्वनाथ कंबलियाल यांनी केलं. आकाशवाणीच्या क्षेत्रीय कार्यक्रम समन्वय समितीची बैठक नागपूर इथं आज आयोजित करण्यात आली, त्या वेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. बहुजन हिताय बहुजन सुखाय हे आकाशवाणीचं ब्रीद आपल्याला जपायचं आहे असं आवाहन आकाशवाणी मुंबईचे कार्यक्रम प्रमुख नारायण पवार यांनी केलं. याशिवाय आकाशवाणी नागपूरचे कार्यालय प्रमुख रमेश घरडे आणि कार्यक्रम प्रमुख रचना पोपटकर यांनी उपस्थितांना संबोधित केलं. आकाशवाणी नागपूरद्वारा ही बैठक आयोजित करण्यात

आली असून या बैठकीचं उद्घाटन आज सकाळी साडे नऊ वाजता कंबलियाल यांच्या हस्ते झालं. महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांचे कार्यक्रम प्रमुख या बैठकीस उपस्थित होते. ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंतच्या आकाशवाणी कार्यक्रमांचं नियोजन या बैठकीत करण्यात आलं.

महिला महाशिबीर

काटकसरीने घर चालवणाऱ्या बहिणींना आधार देण्यासाठी सरकारने लाडकी बहिण योजना राबवली. आणि दोन महिन्याचे तीन हजार रूपये देखील खात्यावर जमा करण्यात आले. मात्र, बदलापूर घटनेच्या पाश्व'भूमीवर महिलांना सुरक्षीत कधी करणार असा प्रश्न विरोधक करत आहेत. लाडकी बहिण योजनेबरोबरच आता सुरक्षीत बहिण योजनाही राबवण्यात येईल असं प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. निवडणूक संपली तरीही ही योजना सुरूच राहील इतकच नव्हे तर ऑगस्ट महिन्याची मुदत संपल्यानंतरही सप्टेंबर मध्ये अर्ज भरणाऱ्या बहिणींना देखील आर्थिक मदत दिली जाईल अशी ग्वाहीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानाअंतर्गत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये महिलांचं महाशिबीर आयोजित करण्यात आलं आहे. यात उपस्थित राहून मुख्यमंत्र्यांनी महिलांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सरकारने लाडकी बहिणच नव्हे तर राज्यातील लाडके भाऊ म्हणजेच युवकांना दहा हजार रूपये वेतनावर प्रशिक्षणार्थी म्हणून काम तसेच शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्यासह अनेक योजना राबवल्याचं सांगितलं.

गणेश मंडळ शुल्क

येत्या ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरूवात होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या निर्देशानुसार मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी परवानगी शुल्क माफ करण्याचा निर्णय जारी केला आहे.गणेश मंडळाच्या परवानगीसाठी आकारण्यात येणारे अर्ज पडताळणी व निरिक्षण शुल्क २०० रुपये तसेच १००० ते ५००० रुपयांपर्यंत अनामत रक्कम पूर्णपणे माफ करण्यात आली आहे.नागपूर शहरात श्री गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याच्या दृष्टिने चौधरी यांनी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. पीओपी मूर्ती खरेदी करु नये, ‘एक संकुल एक गणपती’ संकल्पना राबवावी, सर्व मुर्तीकार आणि कलावंतानी मुर्तीची निर्मिती करण्याकरीता मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत परवाना घ्यावा तसेच, गणेश मंडळाची नोंदणी करण्याकरीता

उपलब्ध ऑनलाईन लिंकवर नोंदणी करावी, झोननिहाय फॅसिलिटेशन सेंटर उभारण्यात यावे, अशा २० सूचनांचा यात समावेश आहे.

अग्निशमन

नागरिकांना तत्पर अग्निशमन सेवा उपलब्ध करून देण्याकरिता अग्निशमन आणि आपात्कालीन सेवा विभागाचे बळकटीकरण आवश्यक आहे. त्यादृष्टीने नागपूर महानगरपालिकेने महत्वाचे पाउल उचलत, शहरात २२ अग्निशमन केंद्र प्रस्तावित केली असून या केंद्रांच्या मास्टर प्लॅनला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सद्यस्थितीत अग्निशमन व आपात्कालिन सेवा विभागाच्या आस्थापनेवर १३ अग्निशमन केंद्र असून सध्या ९ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. ३ अग्निशमन केंद्राचे बांधकाम सुरू आहे व शहरातील विस्तारीत लोकवस्तीचे क्षेत्रफळ व लोकसंख्येनुसार नव्याने १० अग्निशमन केंद्राकरिता आरक्षित जागा उपलब्ध करण्यास प्रस्तावित केले आहे.

उद्धव ठाकरे - महाराष्ट्र बंद

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीनं उद्या २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. राजकीय कारणासाठी उद्याचा बंद नाही,तर विकृती विरुद्ध हा बंद पाळण्यात येणार असल्याचं महाविकास आघाडीतील नेते उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

चंद्रपूरात एक दिवसीय बंद

बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ चंद्रपूर येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने आज एक दिवसीय बंद पार पडला. यावेळी सकल हिंदू समाजाच्या वतीने सकाळी १०.३० वाजता शिवाजी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शिस्तबद्ध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत बांगलादेशातील हिंदुवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात नारे दिले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी

आयकर अधिकाऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शिकून त्याचा सुयोग्यपणे आपल्या व्यावसायिक कारकिर्दीमध्ये उपयोग करावा असं आवाहन नागपूरच्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ कुलगुरू डॉ. विजेंदर कुमार यांनी आज नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं केलं. आयकर विभागात नव्याने पदोन्नती मिळालेल्या सहाय्यक आयुक्तांच्या 'उत्तरायण-2024' या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी

अकादमीचे प्रशासकीय अतिरिक्त महासंचालक मनीष कुमार प्रामुख्याने उपस्थित होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे कधीच मानवी बुद्धिमत्तेला हद्दपार करू शकत नाही. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि गैरवापर यातील धुसर रेषा ओळखून अधिकाऱ्यांनी या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपल्या व्यावसायिक कौशल्यासाठी करावा असं आवाहन डॉ.विजेंदर कुमार यांनी यावेळी केलं. 8 जुलैपासून सुरू झालेल्या या 7 आठवड्याच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये एकूण 131 सहाय्यक आयुक्तांपैकी 38 महिला अधिकारी आहेत. सर्वाधिक अधिकारी हे महाराष्ट्र राज्यातील असून या तुकडीतील अधिकाऱ्यांचा सरासरी सेवाकाळ हा 28 वर्षांचा असेल. या तुकडीतील सर्वात तरुण अधिकारी हे 47 वर्षाचे असून सर्वात जेष्ठ अधिकारी हे 59 वर्षाचे आहेत.

*****